खाजगी शुश्रूषागृहाचे लेटरहेड वरती असणे

मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद सांगली.

विषय :- महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत **माझ्या ..................................या शुश्रूषागृहाचे नोंदणी रद्द होवून मिळणेबाबत..**

मा.महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, आपल्या आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली या कार्यालयाअंतर्गत माझ्या या ...................शुश्रूषागृहाची महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत नोंदणी झालेली आहे.

तरी माझ्या ..................या कारणामुळे माझ्या शुश्रूषागृहाचे नोंदणी रद्द होवून मिळणेकरीता प्रस्ताव सादर करत आहे.

मी माझ्या शुश्रूषागृहामध्ये दि...................ते आजअखेर कोणतेही आंतररुग्ण सेवा दिलेली नाही तसे मी प्रतिज्ञापत्र करुन सोबत जोडले आहे.

तरी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे की, माझ्या या ..................... शुश्रूषागृहाची नोंदणी रद्द होवून मिळावे ही विनंती.

सोबत :- प्रतिज्ञापत्र व मुळ प्रमाणपत्र.

आपला विश्वासू

डॉक्टर नावः-

खाजगी शुश्रूषागृह नाव :-

सध्यस्थिती पूर्ण पत्ता (पिनकोड सहित) :-

मोबाईल नंबरः-

१०० रु बॉन्ड वरील

# प्रतिज्ञापत्र

मे. .................,

यांचे समोर...

प्रतिज्ञापत्र करणार डॉ..................वय- ......वर्ष, व्यवसाय- वैद्यकिय रा. .........., ता. ........जि. सांगली.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की, मी वरील गावचा कायमचा रहीवासी असून या गावचा व नावचा मीच आहे. अन्य कोणी नाही.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की, .......... ता. ......... जि. सांगली येथे .................हे शुश्रुषागृह माझ्या नावाने महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली येथे नोंदणी आहे. मी माझ्या ....................................या शुश्रुषागृहामधील अंतरुग्ण सेवा विभाग हि दि. ................ ते आजअखेर अखेर बंद आहे. वरील कालावधीमध्ये .................................कारणास्तव अंतरुग्ण सेवा विभाग बंद आहे.

तरी मी माझ्या या .............शुश्रूषागृहामध्ये दि. ................ ते आजअखेर कोणतेही आंतररुग्ण सेवा दिली नाही. तसेच या कालावधीमध्ये व यापुढे आंतररुग्ण सेवा दिल्याचे किंवा निदर्शनास आल्यास होणाऱ्या योग्य त्या कारवाईस मी सर्वस्वी जबाबदार राहीन याची मला कल्पना आहे. हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहुन सांगत आहे.

तरी मी यापुढे आंतररुग्ण आरोग्य सेवा देणार नसून माझे ...........या शुश्रूषागृहाचे महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली या कार्यालयाकडे असलेली नोंदणी रदद् होणेविषयी शिफारस केली आहे.

वरील सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो खोटा ठरलेस आय.पी.सी. कलम १९९/२०० व महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) नुसार होणाऱ्या शिक्षेस पात्र राहीन.